**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्रं.३९०/२०१८</u>**
<u>आनंद वाईन्स वि. हॉटेल अभिजीत</u>
**<u>नि.क्र.५ लगत</u>**

**<u>साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर पुढील उलटतपास आरोपीतर्फे श्री.पी.जी.नावंदर यांच्याद्वारे सुरुः–</u>**

आरोपी याच्या सोबत दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीतच व्यवहार झालेला आहे. आरोपी यांनी घेतलेल्या मालापोटी काही रक्कम रोखीने दिली तर काही रक्कम चेकद्वारे दिली आहे. सोलापूर जनता सहकारी बँक च्या खात्यावर मी व्यवहार ठेवलेला होता. त्याबाबतच्या नोंदी माझ्या खात्यावर नमूद केलेल्या आहेत. मी दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ पर्यंतचा सोलापूर बँकेचा खाते उतारा या केसच्या कामी दाखल केलेला नाही. आरोपी याच्या कडून रक्कम रु.२३,३८,५८१/– येणे आहेत हे दाखवणारा माझ्या बँकेमध्ये कोणताही खातेउतारा पुरावा म्हणून मी दाखल केला नाही.

अरथानी अॅन्ड सन्स हे सोलापूर येथील व्यापारी होय. तसेच ग्रुप डिस्ट्रीब्युटर हा पण आमच्या व्यवसायातील सप्लायर आहे. सुभाष ट्रेडींग कंपनी हा सोलापूर येथील सप्लायर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सोलापूर मधील व्यपारी पण उदगीर व लगतच्या भागामध्ये माल सप्लाय करतात. आरोपी याने पण सोलापूर येथील व्यापाऱ्यांकडून मला घेतलेला असू शकतो. आरोपीला सोलापूर जनता बँकेमध्ये खाते मी काढून दिलेले नाही. आरोपी यांच्याकडून दि.०१/०४/२०१७ ते दि.२२/०३/२०१८ धनादेश क्र.३०८९३८ ते ३०८९५३ द्वारे रक्कम रु.१,४८,०५,०१६/–

माझ्या खात्यावर जमा झाले आहेत काय हे मी खाते उतारा पाहू शकतो जी रक्कम दिली आहे ती त्या खाते उताऱ्यात नमूद असणारच.

दि.२२/०३/२०१८ रोजी धनोदश क्र.३०८९५३ द्वारे माझ्या खात्यावर रु.३,००,०००/– जमा झाले असतील तर ते माझ्या खात्यावर नमूद असतील. दि.२२ मार्च, २०१८ नंतर माझ्या व आरोपी दरम्यान कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. नि.क्र.६ वरील चेक हा अकाऊंट–पेई आहे. नि.क्र.६ वरील चेक हा ३०८९ च्या सेरीज नंतरचा ३१२६६९ या सेरीज पैकी आहे. सुवर्णमाला या फक्त घरकाम करतात का काय हे मला माहीत नाही. यशवंतराव व माझा परिचय बऱ्याच दिवसांपासून आहे. दि.१२/०४/२०१७ पूर्वी यशवंतराव हे मालाची मागणी करण्यासाठी आले होते का काय हे मला आठवत नाही. माझ्याकडे मनुष्यबळ बऱ्यापैकी आहे. त्यावेळी देवणी येथे फक्त एक हॉटेल अभिजीत होते का काय हे मला नक्की सांगता येत नाही. मी देवणी हॉटेल अभिजीतला गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी जागेवर असणाऱ्यावर हॉटेलची पाहणी करूनच त्यांना माल पुरवठा करण्याचे ठरवले. आरोपी महिला असल्याने तिला सोलापूर जनता सहकारी बॅंकेचे खाते मी उघडून दिले नाही. चेक सादर करण्यासाठी माझा अकाऊंटंट गेला होता. नि.क्र.८ वरील मेमो मला दाखवला, त्यावर सही करणार अधिकारी याच्या सहीजवळ त्या बॅंकेचा गोल शिक्का नाही. तर मेमोवर तारखेच्याजवळ सोलापूर जनता सहकारी बॅंक, शाखा उदगीर या नावाचा शिक्का मारलेला दिसतो.

हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/०४/२००७ ते ०३/०३/२०१८ पर्यंत असे मी ते हॉटेल ११ वर्षासाठी चालवायला घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी हॉटेल अभिजीत ११ वर्षांसाठी रु.६,००,०००/- भाड्यापोटी चालवायला घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.०१/०४/२००७ ला मी रु.३,५०,०००/- भाड्यापोटी मी आरोपीला दिलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी रु.४,००,०००/- यशवंतराव यांना दिले.

हे म्हणणे खरे नाही की, मी ते हॉटेल वार्षिक रु.५,००,०००/- भाड्यावर घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, रु.४७,५०,०००/- भाडे शिल्लक होते ते प्रत्येक वर्षी टप्प्याने देतो असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यानंतर ते भाडे कधी आरोपी यांना दिलेच नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नंतर भाडे देण्याचे सांगितले व दि.०१/०४/२०१८ ला धंदा बंद करत असल्याचे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/०४/२०१७ माझ्या सहकाऱ्याने आरोपीला सोलापूर जनता सहकारी बँकेत खाते काढून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी थकीत भाडे आजपर्यंत आरोपीला दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चेक क्र.३१२६६९ हा माझ्याकडे तारण म्हणून ठेवलेला होता त्याचा मी गैरवापर करून बनावट केस तयार केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे रु.४७,५०,०००/- बुडवण्यासाठी मी बनावट केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१८, मार्चला मी हॉटेल सोडल्यापासून धनाजी

जाधव व बिरादार हे चालवत होते. हे म्हणणे खरे नाही की, उत्तर नोटीसमध्ये दिलेल्या स्पष्टीकरणाला उत्तर न देता मी खोटी केस तयार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस केली असून खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणत्याही कायदेशीर देण्यापोटी आरोपीने मला धनादेश दिला नव्हता. चेक वरील सही सोडून इतर मजकूर आरोपीच्या हस्ताक्षरात आहे का नाही हे मला माहीत नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.03.18 17:08:06 +0530

**ठिकाणःउदगीर** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**दिनांकः१८/०३/२०२६** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**